# MODULE 4

## SESSION 5 - Education for whom ?

### Main ideas

- Traditionally, a large section of people in our country - including girls, 'lower' castes, and untouchables - have been denied access to formal education. Although some changes did take place during British rule, formal education continued to remain the privilege of the upper castes and classes.
- After Independence, our Constitution gave the right to education for all the status of a Directive Principle, hoping that it would become a Fundamental Right within 10 years. In the decades that followed, efforts were made to increase access to schools, particularly at the primary level, and many people benefitted from this.
- From the mid-1980s onwards, the government's priorities began to change. New economic policies were introduced, and the thrust was on privatization of sectors that had earlier been the government's responsibility. This had an impact on educational policies too.
- In order to increase access, the government diluted the norms, and literacy rather than education became the focus of its efforts.
- The deterioration in the quality of education also affected the opportunities available to individuals - particularly those belonging to marginalized communities - to work towards a better future.
- It is in the context of all these changes that we need to evaluate the provisions of the Right to Education Act.

### List Of Materials

- Cue card (one per group)
- Flip Chart: 'The Turning Tide'
- Worksheets 3: *The Right to Education* (one copy per student)




©Avehi-Abacus Project

## Activity 1

**Different places, different services**

Divide the class into four groups and give each group a copy of the cue card. The groups have to discuss the points mentioned and make a presentation to the class. Allow about 15 minutes for group work and then call each group to make its presentation.

**Conclude the discussion with help of following points.**

We have seen earlier that since our Independence we have managed to come a long way in the fields of food security, industrial production, infrastructure and other economic and social areas. But have all sections of our society been able to tread this path to progress? Looking at the state of availability of basic facilities in different parts of our country we cannot answer this in affirmative. Despite having progressed in vital areas all the people of our country have not equally benefitted. Education is one of the important vehicles towards a better future. If the facilities of education are not equally made available to all we cannot hope for an equal and just society.

Through the last few sessions, we have been trying to trace the history of education in our country and have seen certain important developments during the time our new country was born and when it was in its early stages of Independence. In this session we will look at the developments nearly three decades after our Independence. It is during these years that our country turned a new leaf. Let us see the state of education in India around 1985. Where did the policies and efforts made before the 80s lead us in the field of education? What were the new changes made? Why? How did these changes come to affect education? What is the state of education today? Let us see what kind of impact these new changes had on conditions of an ordinary family.

©Avehi-Abacus Project


**The Turning Tide**

## Activity 2

### The Turning Tide: Part 1

### चित्र १

दुपारचं ऊन रणरणत होतं. भीमाबाई आणि तिचा मुलगा संतोष चिंचेच्या पाराखाली बसस्टॉपच्या सावलीला थांबून तास व्हायला आला होता. संतोषला घालवायला त्याच्या मित्रमंडळींचं टोळकं पण होतं. ‘‘अरे मुंबईला तुला शारुख नक्कीच दिसेल, करीना पण. मग परत आल्यावर आपल्याला विसरू नको गड्या !’’ असं काय-बाय बोलणं चाललं होतं. गाडीची वाट पाहून कावलेली भीमा पोरांच्या टोळक्यावर करवादली, ‘‘त्यो तिथं सिनेमाच्या



नट-नट्यांना भेटायला न्हवं, पोटापाण्यासाठी चाललाय ! शाणपणाने चार पैसे कमवून पायावर उभा ऱ्हायची अक्कल द्या, नस्ते धडे नका शिकवू त्याला.’’ तितक्यात बसची वाट बघत थांबलेल्या बाकीच्या लोकांमध्ये काही हालचाल झाली. दुरून धुरळा उडवत बस आली आणि चढण्यासाठी सगळ्यांची झुंबड उडाली. भीमा आणि संतोषने पण घुसून जागा पकडली. संतोष मित्रांना हात करतोय तितक्यातच बस सुटलीसुद्धा.

### चित्र २

रस्त्याच्याकडेची नाम्याची चहाची टपरी, भीमाच्या सासऱ्यांचं दाढी-हजामतीचं दुकान (जे तिच्या दिराने बळकावलं होतं), मांगीलाल शेठची कापडाची दुकानं सगळं मागे पडू लागलं. मग आली गावची शाळा - गळक्या छप्पराच्या चार खोल्या आणि फुटलेला, कुंपण नसलेला ओटा ! ओट्यावर बसलेल्या ३०-४० मुलांना गुरुजी काय बाय ओरडून शिकवत होते. अर्ध्याहून जास्ती मुलांचं लक्ष बाहेरची मजा पहाण्यात, एकमेकांची टवाळी करण्यातच लागलं होतं. दारं नसलेल्या वर्गात, बाईंच्यापुढे १५-२० छोटी मुलं बसून होती. बाई लिहायचं काय तरी काम करत होत्या. त्यांच्या बाजूला उभी एक पोरगी हावभाव करून गात होती, छोटी पोरं

©Avehi-Abacus Project



ते जमेल तसं म्हणत होती. ‘‘जॉनी जॉनी, यस् पापा...’’

बसने आता वेग घेतला. शाळेच्या बाजूचं तलाठ्याचं ऑफीस, अंबाबाईचं देऊळ, सितारामचा जेवणाचा धाबा, ममदू पिराचा दर्गा, म्हारवाडा, मरीमाईचं देऊळ मागं पडून शेतं, माळरान सुरू झालं.

भीमाबाईनं पहाटे उठून घरातली आवराआवर केली होती. आठ-दहा दिवस घर बंद ठेवण्याच्या तयारीने होतं-न्हवतं ते धान्य कपाटात ठेवलं. बरोबर नेण्यासाठी भाकर, चटणी घेतली. मुंबईला पावण्यांकडे घरचं म्हणून देण्यासाठी जात्यावर दळलेलं ज्वारीचं पीठ, कुटलेली शेंगदाण्याची चटणी, दशम्या हे बांधलं. घरात गरिबी अठरा-विश्वं ! दुसऱ्याला देणार काय ? पण रिकाम्या हाती कसं जावं ? धुतलेले कपडे दोन पिशव्यांत भरले; एक आपली, एक संतोषची. संतोषच्या कपड्यांबरोबर हाताने शिवलेली जुन्या लुगड्यांची गोधडी भरताना मात्र तिच्या डोळ्यात पाणी आलं. एकुलतं एक लेकरू, लोकाच्या दारी सोडायच्या विचाराने जीव कालवला. पण करणार काय ?

## चित्र ३




पाथरगाव - भीमाचं सासरचं गाव मागं पडत चाललं होतं. पाथरगावसारखीच लहानशी तीन खेडी गेली नी भीमाच्या माहेरच्या गावची निंबगावची शीव सरू झाली. भीमा आणि संतोष दोघंही खिडकीतून आसुसून बाहेर पाहू लागले. निंबगावला बस थांबली आणि भीमाचा धाकटा भाऊ-संतोषचा दशरथ मामा खांद्यावरची खाऊची पिशवी सांभाळत पळत बसजवळ धावत आला. भीमाच्या हातात पिशवी देऊन म्हणाला ‘‘...वाटेत खायला खाऊ पाठवलाय, चुरमुऱ्यांचे लाडू आहेत आणि मुंबईच्या पावण्यांसाठी वेगळा डबा हाय ! जपून जा. संतोष, तिकडं शाण्यासारखा राहून मोठा हो बाबा. एकटी आय तुझी किती कष्ट करणार ? तिच्या नावाला बोट लागेल असं

©Avehi-Abacus Project


नको वागू बाबा !'' संतोषने ''हा, मामा'' म्हटले तेवढ्यातच बस सुरू झाली. दशरथने हळूच भीमाच्या हातात १०० रुपयांची नोट सरकवली. ''असू दे - रस्त्यात लागंल. परत येशील तवा हितच ये मुक्कामाला, एक दिस ! मग जा पुढे तुझ्या गावाला''- असं पळत-पळत म्हणून बसच्या पाठीला हात हलवला आणि डोळ्यातलं पाणी खांद्यावरच्या टॉवेलने पुसलं.

## चित्र ४



भीमा आणि संतोषने परत सिटवर बसून विसावलं. खिडकीतून वारा येऊ लागला, बस पुढे पळू लागली. पण भीमाच्या विचारांची चक्रं मात्र उलट्या दिशेने धावू लागली. भीमा, कुंदा आणि दशरथ - न्हाव्याच्या घरात जन्माला आलेली तीन लेकरं. भीमाला तिचं वय विचारलं तर ती सांगेल, ''बा म्हणायचा पाकिस्तानापासून बांगलादेश वेगळा झाला तेव्हा जन्मली मी.'' तिच्या पाठीवर दोन वर्षांनी कुंदा आणि त्यानंतर एकाच वर्षाने दशरथ. दशरथच्या बाळंतपणातनं आई उठलीच नाही - तीन-चार महिन्यांतच देवाघरी गेली. बापानंच मग गावाच्या आधारानं तीन लेकरांना सांभाळलं. दिसभर चार चार गावांच्या बलुतेदारीच्या ओझ्याखाली क्यासं अन् हजामत करत फिरे. ते पण परवडण्यासारख राहिलं न्हवतं.

## चित्र ५




पूर्वी शेतकऱ्यांच्या घरातून धान्य मिळायचं, मिठा-तेलासाठी फक्त पैसे लागायचे. बाकीचे बलुतेदार कधी कापडं, कधी पैसे द्यायचे. आता शेतकऱ्यांना पण धान्य देणं परवडेना. पैसे हातावर ठेवले तरी पुरे. बहुतेक जण ते पण सोयिस्कर विसरून जायचे - मागण्याची पण चोरी ! 'ही बलुती न्हवगंड फारच माजलीत आता. मुंबई, पुण्यागत पैशे मागायला लागलीत'- असं ऐकून दाखवायची. शेतकऱ्यांना पण शेतीचा बोजा जड

©Avehi-Abacus Project

होऊ लागला होता. एकत्र कुटुंबांच्या जमिनीचे तुकडे झाले होते. नवीन बियाणं, खतं, बोरींग, जंतुनाशकं सगळा खर्च जाऊन हातात काहीच राहात नव्हतं. बिचारे शेतकरीसुद्धा आठवडा-आठवडा दाढी करेनासे झाले. कधी तालुक्याच्या कामाला गेल्यास स्वस्तात मिळते म्हणून तिथेच हजामत करून येत. अश्या गरिबीत भीमाचा बा तीन लेकरांचा संसार एकटा ओढत होता.

## चित्र ६




अर्थातच भीमा थोरली पोरगी म्हणून शेंबूड पुसत-पुसत घरातलं पण काम बघायला लागली. कपडे धू, भांडी घास, केरकचरा कर, बारक्या पोरांना बघ... दशरथला तर तिनेच आईची माया दिली.

गावची शाळा चौथीपर्यंत. भीमाची आणि शाळेची भेट फक्त शेण, काटक्या गोळा करायला माळरानात - जंगलात जाता येतानाच व्हायची. त्या काळात दोन पोरींच्या शिक्षणाचा विचार बाच्या डोक्यात येणं अशक्यच ! बामण-पाटलांची, कासाराची आणि कुणब्यांची पोरं पोरी जायची शाळेत. चार वर्गांना शिकवायला एक गुरुजी आणि बाइ. दोघं गावातच राहणारे. ह्याच शाळेत शिकलेले. शनिवार आणि महिना अर्धा रोज ती दोघं लिहायची कामं करत. बाकी अख्खा आठवडा फक्त शिकवण्याचंच काम. गुरुजी, मास्तरीण ‘पोरांनी पण पाठवा’ म्हणून मागे लागायचे पण बा फक्त एकून घेई. शाळेची फक्त फी माफ, बाकीचा खर्च कसा परवडणार ? पण छोट्या दशरथसाठी मात्र बाने कंबर कसली. त्याला शाळेत घातला. दशरथ तसा मन लावून आवडीने शाळेत जाई. घरीपण एकटा बसून पाटीवर काय बाय लिही, पुस्तकातले धडे मोठ्याने वाचून दाखवे, बहिणींना गाणी-कविता हावभाव करून गाऊन दाखवी. दर वर्षी सुताराच्या नाम्याची बरीच जुनी पुस्तकं दशरथला मिळायची पण काही नवीन पुस्तकं आणि वह्या बा विकत आणायचा तेव्हा त्या कोऱ्या पानांचा वास घ्यायला भीमाला फार आवडायचं. पुस्तकांवर हात फिरवून चित्रं बघायला खूप मजा यायची. गावातल्या इतर पोरांना आणि पोरींना शाळेचे कपडे घालून जाता-येताना बघून भीमा मनाच्या आरशात शाळेच्या ड्रेसमध्ये स्वत:ला पाहायची. हळूहळू तो मनातला आरसापण पुसट होत गेला.

©Avehi-Abacus Project

## चित्र ७



गावची शाळा चौथीपर्यंतच पण दशरथ चौथी पास झाला आणि शाळेच्या बाई, बा ला भेटायला घरी आल्या. “देवरामभाऊ तुमचा दशरथ चांगला आहे अभ्यासात. त्याची शाळा तोडू नका अर्ध्यावर. गावची बाकी पोरंपण जातातच ना पाथरगावच्या शाळेत ? त्यांच्याबरोबर पाचवीला पाठवा. निदान सातवी तरी करून दे त्याला. पुढचं पुढे !” बा ने पण बाईचं सांगणं मानलं. नवीन वर्षापासून दशरथ सात कोस दूर पाथरगावला शिकायला जाऊ लागला. मुलामुलींनी भरलेली शाळा ! ह्या शाळेत तर प्रत्येक वर्गाला एक शिक्षक होता. सकाळी सूर्य वर यायच्या अधी उठून बहिणींना घरात साफ-सफाई, पाणी भरायला मदत करून, छोटा दशरथ तासभर चालत शाळेत जाई आणि दुपारच्या रणरणत्या उन्हात घरी परत येई. घरचा अभ्यास मन लावून करायचा आणि घरकामात पण मदत करायचा. कुठे बाच्या धोपटीतलं सामान स्वच्छ करून दे, वस्तऱ्याला धार लावून दे, असं... आईविना वाढणारी लेकरं एकमेकांचे हाल ओळखून होती, बाचं काबाडकष्ट जाणत होती. बा त्याला म्हणे, “अरे, ऱ्हाऊन दे पोरा. तुझ्या हातात वस्तरा नको, वही-पेन्सिलच बरी दिसते. हे पिढ्यान् पिढ्याचं काम आम्ही केलं. पण तू चांगला शीक, मोठा हो !”

असं करता-करता दशरथ सातवीला पोहचला. सातवीची शिष्यवृत्तीची परीक्षा देऊन चांगला पास झाला. परत पाथरगावचे गुरुजी, गावच्या मास्तरांबरोबर घरी थडकले, “देवरामबाबा, दशरथला पुढे तालुक्याला शिकायला पाठवा. त्याला शिष्यवृत्तीची फी माफ आहे. आजकाल बारावीपर्यंत शिकलं तरच पुढं काय करता येईल. सातवी म्हणजे न हितं, ना तिथं ! चांगला शिकेल तर तुम्हाला म्हातारपणाला आधार होईल !” ह्यावेळेस बा जरा विचारात पडला, “गुरुजी आता परवडत न्हाय मला. फी, पुस्तकं, राहण्या-जेवणाचा खर्च कसा परवडेल ? पोरी पण मोठ्या झाल्या माझ्या, त्यांच्या पण लग्नाचं पहायला हवं ना ? पूर्वी सातवी पास झालं की लगीच चांगली नोकरी मिळायची. ह्या शिक्षणाच्या मागं पळणं आमच्या सारख्यांनला कसं परवडायचं ? बारावी झाल्याली पोरं पण बक्कळ झालीत गावात आता.” पण दशरथचे आशेने भरलेले डोळे बघून बा गप्प बसला. नवीन वर्ष सुरू झाल्यावर, कर्ज घेऊन पोराची तालुक्याच्या जागी शाळेची, राहायची सोय करून थकल्यावाणी


©Avehi-Abacus Project

सांजच्याला घरी येऊन टेकला आणि भीमाला म्हणाला, ''पोरी, ह्या शिक्षणाचा खेळ आपल्याला न्हाय परवडत. बसच्या भाड्यालाच केव्हढं पैसं लागलं !'' भीमाने त्याची समजूत काढली, ''बा, आपण जसं जमेल तसं करू, आमीपण शेतावर मजुरी करतो हाओत ना ? थोड्याच वर्षांचा प्रश्न, पुढचं पुढं !''

पण दशरथच्या तालुक्याच्या खाजगी शाळेचा बोजा आता देवराम सांभाळू शकत न्हवता. त्यात दशरथ सुट्टीला घरी येई तेव्हा पहिल्यासारखा आनंदी दिसेनासा झाला. ''खूप अभ्यास हाय, भाषा पन कठीन हाय. तिथली पोरं 'आनी - पानी' आसं चिडवत्यात मला''- असं म्हणू लागला. आठवीत अगदी काठावर पास झाला. नववीत तर नापासच ! घरापासून दूर राहून धड अन्नपाणी नाही, माया नाही, त्यामुळे खंगलेला, खचलेला दशरथ, नववीनंतर शाळेची पायरी परत चढायला तयारच झाला नाही. ''बाकीची पोरं क्लास-शिकवण्या लावतात तिथं चांगला अभ्यास करून घेतात. शाळेत गुरुजी-बाई फक्त हुशार मुलांकडेच लक्ष देतात.''- असं सांगायला लागला.

शेवटी देवरामने पण विचार केला, ''चला, शाळेचा खर्च तर सुटला मागचा. सगळी सोंगं करता येतात, पण पैशांचं सोंग कुठवर करावं ? हाय ते कर्ज कसंबसं फिटण्या एव्हढे पैशे जमवले पाहिजेत. पोरीच्या लग्नाचं पण पाहिलं पाहिजे !

## चित्र ८




भीमा तिथपर्यंत लग्नाच्या वयाची झाली होती. देवरामच्या सासरच्या सोयरिकीतला पोरगा पाथरगावात हाय म्हणून निरोप आला. बा जाऊन भेटून आला. दोन भाऊ, गावच्या रस्त्यालगत त्यांच्या बापाने टपरीमध्ये 'सलून' काढलं होतं. 'हाय-वे' वरून जाणारे ट्रक धाब्याजवळ जेवायला थांबायचे तेव्हा ड्रायवर लोक दाढी-केसपण करून घ्यायचे. धंदा चांगला चालला होता. बलुतेदारीवर पोट विसंबून न्हवतं. बानं लगेच सोयरीक ठरवली, दोन्ही घरचा खर्च आणि जावयाला आंगठी, चेन एव्हढ्यावर काम आटपलं. भीमाच्या सुंदर, सतेज चेहऱ्याकडे बघून सासरच्यांनी पण जास्त ताणून धरलं नाही. नवरा मुलगापण साजेसा होता. गावातली शाळा

©Avehi-Abacus Project

सातवीपर्यंत असूनही त्याने चौथीतच शाळा सोडली होती. त्याला शिकण्यात विशेष रसच न्हवता. पण चांगला लिहू-वाचू शके, पेपर वाचे आणि चित्रं फार छान काढायचा. पण चित्रकलेमुळे चांगले मार्क थोडेच मिळतात ? लग्न होऊन भीमा सासरी निघाली तेव्हा बा, कुंदा आणि दशरथच्या डोळ्यातलं पाणी खळेना. गावची लोकं त्याला समजवायला लागली "अरे असा रडतोस कशाला ? तुझी भीमाक्का लांब थोडीच चाललीय ? तू पाचवीनंतर तिथे शाळेत जाऊन-येऊन करत होतास की ? रडू नको. आता बा ला आधार तुझाच हाय. म्हाताऱ्याला आता मेहनत न्हाय होत !"

## चित्र ९



हळूहळू दशरथने हातपाय हलवायला सुरुवात केली. पाराच्या खाली लोकांची पत्रं लिहिणं, आलेली पत्रं वाचून दाखवणं हे काम सुरू केलं पण त्यावर भागेना. मग हळूहळू जे देवरामला नको होतं तेच झालं. बापाची वस्तऱ्यांची धोपटी दशरथच्या खांद्यावर दिसू लागली. पण भरीला दशरथने शाळेच्या जुन्या मित्राच्या हाताखाली इलेक्ट्रीशियनचं काम शिकून घेतलं. असं चार कामं करून, कसंबस घराचं गाडं ओढू लागले बाप-लेक.

आता देवरामने कुंदा आणि दशरथच्या लग्नाचं पण बघायला सुरुवात केली. पार पाथरडी तालुक्यातली बहीण - भावाची चांगली सोयरीक मिळाली. कुंदासाठी पाहिलेला मुलगा मुंबईला चांगल्या मोठ्या कंपनीत फिटरच्या कामाला होता. त्याची बहीण दशरथला करून एका मांडवात दोन लग्नं आटपून घेतली. दशरथ आणि कुंदाच्या लग्नाच्या वेळी भीमाचा संतोष सहा महिन्यांचा होता. घरात मोठं कोणी नाही म्हणून भीमा आणि तिच्या नवऱ्यानेच दोन्ही लग्नं लावून दिली. मामाच्या मांडीवर बसून मजेत खेळणाऱ्या संतोषला बघून सगळे कौतुक करत होते.

©Avehi-Abacus Project


## चित्र १०



भीमाच्या नवऱ्याने लग्नाच्या खर्चाची केव्हढीतरी जबाबदारी उचलली होती. त्याचं न्हाव्ह्याचं दुकान छान चाललं होतं आणि कर्ता मोठा मुलगा म्हणून घरात मान होता. सगळे गावकरी म्हणाले, ''देवराम तू आणि तुझ्या पोरांनी खूप कष्ट काढले आतापर्यंत. आता चांगले दिवस आले बघ तुम्हाला ! तुझ्या मुली चांगल्या घरी सुखात नांदतील. सून आणि दशरथ सेवा करतील तुझी !''

अशी दोन वर्ष खरंच सुखात गेली. भीमाचा नवरा कुटुंबातला मोठा मुलगा आणि कष्टाळू, समजूतदार. सकाळी लवकर उठून अंधारातच दुकानात पोहोचायचा तो ! पहाटे ट्रकवाले चहाच्या टपरीवर थांबायचे तेव्हा दाढी-केस कापून द्यायचा. धंदा चांगला व्हायचा तेव्हा. पण एक दिवस ट्रकनेच घात केला. अंधारात ट्रकवाल्याला भीमाचा नवरा दिसलाच नाही आणि नको ते झालं.

## चित्र ११



त्या दिवशी भीमा साफ कोसळून गेली; वेडी व्हायचीच बाकी राहिली पण हळूहळू संतोषकडे बघून सावरण्याशिवाय उपाय नव्हता. लवकरच लहान दिराने दुकान ताब्यात घेतलं, सासरा-सासू पण मोठ्या मुलाच्या धक्क्याने गेले आणि भीमाला कोणाचाच आधार उरला नाही. हळूहळू भीमाने लोकांच्या शेतावर मजुरी, रस्ता, विहीर, खोदायची कामं, मोलकरणीचं काम करून आपला आणि संतोषचा गाडा ओढायला सुरुवात केली. आपण शिकलो असतो तर अशी गुरासारखी मजुरी आपल्या पाठी लागली नसती. आता छोट्या संतोषला मात्र खूप शिकवायचं. कितीही हाल काढायला लागले तरीही !''

©Avehi-Abacus Project

**Stop the story here and initiate a discussion with help of the following questions.**

**Questions for discussion**

- What are the changes in education system from Bhima's fathers to son's times? Deoram, Bhima's father was illiterate, why? According to you what conditions of education existed when he was young (during 1960s)?
- What was the then prevalent attitude of people in the village towards education? Was there a difference between attitude to girls and boys? Was there a different attitude amongst different communities? Why do you think so?
- When Dashrath started school; the taluka school was up to class 10, Pathargaon school was up to 7th & Nimbgaon up to 4th - why this difference? What kind of education and other facilities did cities like Bombay and Pune have during the same time?
- From the way Dashrath studied in the village school what kind of school can you describe? (How will you describe the condition of the first two schools Dashrath went to?)
- If Dashrath had completed his schooling what would his future be ?
- Bhima's husband was good in drawing, but not in studies. He dropped-out of school and continued his family's (barber's) profession. - What does this indicate to you about the education system?
- After Bhima lost her husband she pinned her hopes on Santosh's future, what was her revolve? Why?
- Dashrath was teased because of his language. There are a lot of tribal children who speak their own dialects and not even the kind of village Marathi that Dashrath spoke. How are they treated in the schools? What impact it may be having on their confidence and learning.

©Avehi-Abacus Project

After this discussion continue with the second half of the story. Tell the class to remember the questions discussed thus far while listening to the later part. These will be relevant when we come back to discussion at the end of the story.

## The Turning Tide: Part 2

### चित्र १२



“आई, चल ऊठ आता ! औरंगाबाद आलं. उतरायला लागेल आपल्याला.” संतोषने हलवून जागं केलं तेव्हा भीमा खडबडून उठली. झोपेतनं जागं झालेल्या भीमाला - क्षणभर आपण कुठे आहोत, काय चाललयं हे कळेचना. बसच्या बाहेरचं दृश्य आता बदललं होतं. शेतं, माळरानं, गावांची जागा आता बिल्डींगी, दुकानांनी घेतली होती... झगझगते दिवे, मोठे रस्ते, रेल्वे... किती बदललं होतं औरंगाबाद गेल्या काही वर्षांत ! मोठ्ठी दुकानं - त्यांत मिक्सर, फ्रिजपासून धान्य-भाज्यांपर्यंत सगळ्या वस्तू दिसत होत्या. भीमाला आश्चर्य वाटलं. इतक्यात एस. टीचा स्टॉप आला आणि सामान सांभाळून भीमा-संतोष बाहेर पडले. स्टेशनला जाऊन संतोषने मुंबईचं तिकीट काढलं. गाडीला तासभर अवकाश होता तेवढ्यात बरोबर आणलेलं जेवण जेऊन, पाणी भरून घेऊन गाडी पकडायला तयार व्हायचं होतं.

### चित्र १३


स्टेशन पण किती बदललं होतं. पूर्वीची शेव-चिवड्याची दुकानं आता फारशी दिसत नव्हती. प्लास्टिकच्या पाकीटातले महागडे वेफर आणि कोल्ड्रींकनीचं दुकानं भरली होती. संतोषची नजर राहून-राहून तिथे वळत होती हे भीमाने पाहिलं आणि विचार केला... आता पोर लोकाकडे राहील. त्याचे काहीच लाड करता येणार नाहीत. मन मारूनच रहायला लागेल तिथे. थोडे पैसे खर्च झाले तरी चालेल पण त्याच्या आवडीचं काही-बाही घेतलं तर थोडं मनाला समाधान !... भीमा म्हणाली, “चल,

©Avehi-Abacus Project



तुला त्या दुकानातून काय खाऊ पाहिजे तो घे.'' संतोष ओशाळला, ''राहू दे, महाग असतं सगळं''- असं म्हणू लागला. ''अरे, असू दे. मामाने तुला दिले ना पैसे, त्यातनं घेऊ चल !'' दोघं दुकानापाशी गेले आणि संतोषने काळ्या कोल्ड्रींकच्या बाटलीकडे हात दाखवला. दुकानवाल्याने त्याच रंगाच्या कोल्ड्रींकच्या तीन बाटल्या दाखवल्या, ''कुठली हवी ?'' सर्वात लहान बाटली ८ रुपयांला होती. ''म्हणजे काळं महाग नसतं तर हे सगळं ?'' ''नाय आई, ती मोठी बाटली खूप महाग, - ६० रुपयाला आहे.'' भीमा म्हणाली ''बरं तू घे ती छोटी, पण तो काळा कोकोकोला नको, शी ! त्यापेक्षा ते नारंगी नाही तर आंब्याचं घे !''

## चित्र १४



काळ्या रंगाचं सरबत लोक का पितात हा भीमाला कित्येक वर्षांपासून पडलेला प्रश्न संतोष सोडवू पहात होता, ''अग आई तू पण घोट घेऊन पहा, चांगलं लागतं !'' भीमाने थंड सरबताचा एक घोट घेतला. नळीतून सुर्रकन घश्यात सरबत गेलं तेव्हा तिला जरा ठसका लागला पण चव मजेदार होती. तिने दुकानदाराकडे पाणी मागितलं. दुकानदार म्हणाला, 'अजून १० रुपये द्या.' भीमा आश्चर्यातच पडली. कोकोकोला ८ रु आणि पाण्याची किंमत मोजायची ती मात्र १० रु. ? तिने राहू दे म्हटलं. स्टेशनच्या नाक्यावर पिऊ नंतर असा विचार केला.

©Avehi-Abacus Project

## चित्र १५



दोघांनी फलाटावरच नळाजवळ बाकड्यांवर बसून जेवण करून घेतलं. जवळच्या बाटलीत नळावरचं पाणी भरून घेतलं. फलाटावर गर्दी वाढत होतीच. जवळच्या चार-पाच माणसांना विचारून ‘जनरलचा’ डबा विचारून घेतला. तिथे भरपूर गर्दी जमलेली होती.

## चित्र १६



ट्रेन आली तशी डब्यात घुसायची एकच झुंबड झाली. गर्दीत घुसून दोघांनी जागा पटकावली. आता बारा तास प्रवासानंतर मुंबई ! लवकरच गाडी सुरू झाली. सुरुवातीच्या जागेच्या वादावादीनंतर हळूहळू डब्यात शांतता झाली. लोकं झोपायची तयारी करू लागली. भीमाचा पण डोळा लागला.


## चित्र १७



संतोषच्या खांद्यावर मान टाकून भीमा विसावली. संतोषने जरा सरकून आईला नीट बसता येण्यासाठी जागा करून दिली. भीमाच्या डोळ्यात पाणी आलं. लहानपणी पण नवरा गेल्यावर भीमा हातपाय गाळून बसायची तेव्हा छोटा संतोषच जवळ येऊन तिची समजूत घालायचा. संतोषकडे बघूनच भीमा परत धीर करून उठायची.

©Avehi-Abacus Project


## चित्र १८



केव्हढ्या आशेने संतोषला आंगणवाडीत घातलं तिने. आंगणवाडीत खाऊ मिळायचा, औषधं मिळायची. आंगणवाडीची मावशी छान-छान गाणी शिकवायची. संतोषला सगळी गाणी तोंडपाठ ! सहा वर्षाचा झाल्यावर संतोषला शाळेत घातलं भीमाने. तिला बरं वाटलं कारण ही शाळा सातवीपर्यंत होती. मामासारखं तास-दीडतास चालत कुठे जायची गरज न्हवता.

पण पहिलीत गेलेला संतोष मात्र अजून आंगणवाडीतली गाणी म्हणत होता. नवीन काय शिकवलं विचारलं तर काहीच सांगू शकत न्हवता. भीमा शाळेत विचारायला गेली तर गुरुजी टेबलावर लिहायचं काम करत बसले होते आणि बाई गावात संडासांची माहिती गोळा करायला गेल्या होत्या. गुरुजींनी फळ्यावर काही लिहिलं होतं. थोडी मोठी मुलं ते उतरून घेत होती. बाजूच्या वर्गात त्याहून जरा मोठी मुलं बसली होती. एक चुणचुणीत मुलगी पुस्तकातला धडा वाचून दाखवत होती आणि इतर तिच्या मागे तो धडा गिरवत होती. संतोषच्या वयाची मुलं एका कोपऱ्यात जरा मोठ्या मुलांच्या मागून [illegible] होती. भीमाने घाबरत गुरुजींना विचारलं. “मी संतोषची आई, माझा संतोष अभ्यासात कसा आहे ?” गुरुजी म्हणाले, “ठीक आहे तो. काळजी करू नका, आताच शाळेची सुरुवात होते आहे ना. शिकवायला अजून सुरुवात केली नाही आम्ही.” भीमा परत आली.

## चित्र १९



वर्षभरात संतोष पाटीवर काहीतरी गिरवत होता. पुस्तक काढून पहात होता. वर्षाअखेरीला पहिलीतून तो दुसरीत गेला तेव्हा भीमाला आनंद झाला. संतोष कसा पास झाला, किती मार्क मिळाले हे विचारायला भीमा शाळेत गेली तर पहिले गुरुजी न्हवते. बाई आणि नवीन गुरुजी म्हणाले, “काळजी करू नका ताई, कोणीच नापास होत नाही आमच्या शाळेत.”

©Avehi-Abacus Project

भीमाला ह्याचा अर्थ काय लावायचा तेच कळेना. अशीच वर्षं पुढे जात, संतोष पाचवीत पोहोचला.

## चित्र २०

दशरथमामा एकदा घरी आला तेव्हा म्हणाला, आता लवकरच त्याला तालुक्याला शिकायला घालू आपण. इथली शाळा तर फक्त सातवीपर्यंतच आहे. माझी काही ओळख काढतो आणि पूर्वीच्या माझ्या शाळेत घालतो त्याला. लहान संतोष आता काही वर्षांतच दूर जाणार ह्या कल्पनेने भीमाला कसंसं झालं पण मनावर घट्ट दगड ठेऊन तिने होकार दिला. दशरथ एक दिवस संतोषला तालुक्याला घेऊन गेला.




## चित्र २१

संध्याकाळी घरी आल्यावर मात्र मामा-भाच्याच्या चेहऱ्यावर सकाळचा तजेला न्हवता. भीमाने विचारल्यावर दशरथ म्हणाला, “मास्तर म्हणतात, त्याच्या वयाच्या मुलांचे त्याला काहीच येत नाही अजून. सरळ वाचता येत नाही, गणित कच्चं आहे. लिहीण्याची पण बोंबच !” संतोष मोठ्ठा गुन्हा केल्यासारखा खाली मान घालून बसला होता. “शाळेत काय शिकवतच नाहीत, बाई शिकवायच्या पण गेल्या दोन वर्षांत दोनदा बाळ होण्याची रजा घेतली त्यांनी. एकच सर असतात शाळेत. तेच बघतात सर्व वर्ग !”- संतोषने सांगितलं.





©Avehi-Abacus Project

## चित्र २२




भीमा आणि दशरथने विचार केला. पाथरगाव काय किंवा निंबगाव काय - शाळांची परिस्थिती अशीच झाली होती आजकाल. भीमाने शेजारच्या वाडीतल्या सलमाला विचारायचं ठरवलं. ती शहरातून शिकून गावात लग्न होऊन आली होती. फावल्या वेळात थोडे पैसे घेऊन संतोषला शिकवणी ठेवण्याची सोय करायचं ठरलं. आता शाळेबरोबरच संतोष घरीपण शिकवणी घेऊ लागला. सातवीच्या वर्षाअखेरीस संतोषला शाळेत चांगले मार्क मिळाले.

## चित्र २३



पण दशरथने तालुक्याच्या प्रायवेट शाळेत प्रवेशासाठी प्रयत्न केला तेव्हा, ''जागा नाही, खूप ठिकाणाहून चांगल्या मार्कांची मुलंमुली येतात इथे, पुढच्या वर्षी या !'' अशी बोळवण करण्यात आली. संतोष हिरमुसल्यासारखा झाला. शेवटी दशरथने त्याला काही महिने इलेक्ट्रिकचं काम शिकवण्यासाठी आपल्याकडे ठेवला.

## चित्र २४



दशरथच्या तीन मुलांची अवस्थापण अशी तशीच होती. त्याच्या चौथीच्या वयाच्या मुलाने कंटाळा येतो म्हणून केव्हाच शाळा सोडली होती. दोन लहान मुली खाऊ-खिचडी मिळते म्हणून शाळेत जायच्या. सध्याच सरपंचाच्या घराजवळ, पाराखाली नवीन शाळा सुरू झाली होती. वयाने मोठ्या, शाळा मध्येच सोडलेल्या मुला-मुलींसाठी. दशरथच्या मोठ्या मुलाला पण जबरदस्तीने झाडाखालच्या शाळेत भरती केलं होतं.

©Avehi-Abacus Project

सरपंचांचं तसं फर्मानच होतं. त्या शाळेत शिकवायला दहावी दोनदा फेल झालेला, संतोषपेक्षा दोन वर्षांनी मोठा महेश 'गुरुजी' म्हणून लागला होता. त्याला म्हणे १०००रु. पगार होता. 'संतोषने शिकून तेव्हढं केलं असतं तरी खूप झालं असतं' असं भीमाच्या मनात आलं.

दशरथच्या पाठी फिरून संतोषच्या हातात काही विशेष पैसे पण पडत न्हवते, उलट मामाच्या गरीब घरी बोजा होऊन आपण राहातोय ही खंत वाटत होती.

## चित्र २५




शेवटी मुंबईला आपल्या धाकट्या बहिणीकडे-कुंदाकडे संतोषला पाठवावं असा भीमाने विचार केला. कुंदाची परिस्थिती चांगली होती. नवऱ्याला चांगली नोकरी. दोन्ही मुली कॉलेज शिकत होत्या. त्या पहिल्यापासून प्रायवेट शाळेत गेल्या होत्या. भरीला त्यांना महागड्या ट्यूशन क्लासला पण पाठवायचे. भीमाने पत्र लिहून बहिणीला आणि भावोजींना विनंती केली. "संतोषला आणा इथे काहीतरी सोय लावून देतो" अशा अर्थाचं उत्तर आलं. भीमाने मनावर दगड ठेवून पोराला मुंबईला कामासाठी पाठवण्याचं ठरवलं. तेव्हापासून दिवसभर कष्ट करून थकलेल्या भीमाला एकही रात्र शांत झोप लागली नाही.

## चित्र २६

आता पण गाडीच्या गचक्याने ती खडबडून उठली. मघाशी बोलणारी, खाणारी, भांडणारी सगळी मंडळी आता थकून चिडीचूप पेंगत होती. ट्रेनच्या मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात समोरच्या बाकड्यावर एक नवीन तरूण पोरगा मोठ्ठं पुस्तक वाचत बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर तेज, शहरी लोकांचा आत्मविश्वास दिसत होता. संतोषच्या आसपासच्या वयाचाच दिसत होता तो. इतक्यात संतोषच्या मांडीवरच्या सामानाची एक पिशवी खाली पडायच्या आधी त्याने सावरून घेतली आणि भीमाकडे पाहून तो दिलाश्याने तो हसला. भीमाच्या मनात प्रश्न आला ! हा

©Avehi-Abacus Project



शहरातला, श्रीमंत घरातला पोरगा ह्या ‘जनरल’ डब्यात कसा ? “कुठून चढला बाबा तू ? डबा चुकला का तुझा ?”
ती म्हणाली. “नाही मावशी. मी मूळ मुंबईचाच पण ह्या भागात खेड्यात राहून काही वर्षं काम करतोय. सुट्टीसाठी घरी चाललोय. तुम्ही झोपा निवांत. मी वाचतोय, सामानाकडे लक्ष आहे माझं !” दिवसभर थकलेल्या भीमानं एकदा संतोषकडे आणि एकदा त्या समोरच्या तरूण पोराकडे पाहिलं आणि परत एकदा संतोषच्या खांद्यावर मान टेकून थकलेले डोळे मिटून घेतले.

**Questions for discussion**

- What were the main features of education systems about 40 years ago, 20 years ago and what are the main features today?
- What are the positive and negative factors in these three different periods?
- Imagining Bhima's family as a prototype of an Indian rural family (about 60 – 70%) what can we comment on people's living conditions and education?
- What according to you today are the main features of our education system?
- Does education really make a different to the quality of our life? Discuss with reference to Bhima's father, Bhima, Dhashrath, Dashrath's children, Kunda's daughters, Santosh and the young boy in the train.
- Santosh went to an Anganwadi and Balwadi; Bhima's brother Dashrath did not. Why? Do you think children need pre-primary education? Do all children need pre-primary education? What happens if children are denied pre-primary education?
- Do you think children need complete school education at least up to higher secondary? Why? Can all afford to get it by private channel?

©Avehi-Abacus Project

- Do you know that a very large majority of children who go to government schools do not have the basic skills of reading-writing? Why does this happen?
- The RTE 09 Act has come into force since April 2010. Given below are some crucial features of this act. Reflect on them in context of Bhima's story and comment. "Does the Act truly fulfill the Constitutional guarantee of free, quality education to all? Does it ensure equality of opportunity?

## Sum up

Bhima and her family represent a large number of people in our country. Traditionally most of them did not have the advantage of education. The traditional Indian 'working class' – known as *'Balutedars'* in Maharashrta for example (artisans, crafts people, skilled labourers) as well as small farmers can said to have lived like this since centuries. There were certainly some exceptions to these conditions. The British education system did make a few outward changes but the situation did not drastically change even when Independence dawned. Due to the low economic and social status majority of the boys either remained illiterate or may have gone to school for a few years even after Independence. The girls in particular remained uneducated primarily because of social customs and beliefs. Long tradition of lack education also resulted in continued low economic status. This 'tradition of un-education' can be said to be self-perpetuating i.e. if the 'father' remained illiterate due to poverty and or lack of social tradition of learning; then the children too remained outside school. (Bima's father's - Deoram's generation.)

After Independence education gained an important status of a unique 'Directive Principal'. Elementary education in particular was to be made into a legally

©Avehi-Abacus Project

ensured fundamental right within a timeline of 10 years. However; this did not happen. After Independence though the political and administrative class could not totally ignore the Constitutional commitment and thus efforts were made to spread elementary education. (Bhima, Dashrath and Kunda's generation of learners can said to be representatives of this period.) Even though the spread remained limited and the infrastructure poor children who completed elementary schooling could continue secondary, higher secondary and sometimes higher education if they had the desire and the means to do so. Elementary education Constitutional goal) was largely taken care of by the government but secondary onward it was with private bodies and only if one had the economic capacity. Increasingly large number of people began to see education as an important asset to change the social status and break the cycle of poverty. But with new technology – (new skills replacing old ones), urbanization, more people began seeing the need for formal education. The competition after the secondary and higher secondary levels began becoming severe. (Where approximately four decades before a person could get a desk job after completing elementary level became unattainable even after higher secondary or college education.) However the government still tried to evaluate its progress and displayed intentions to improve the system – spread of pre-primary education and trying to improve infrastructure in schools (Operation Blackboard) was set in motion during this period.

Around 1990s India began changing its economic policies. Thrust on economic growth by privatization and reduction of State's responsibility in all areas became the mantra of change. But while the 'private economy prospered and GDP soared a massive number of people

©Avehi-Abacus Project

(more than 50%) remained outside the gamut of formal education. In order to cater to the growing demand for education the government changed its norms and standards. Limited money was being used to cater to more people and teachers with low qualification, giving part time instruction in non-formal schools as well as regular teachers doing non-teaching jobs became a norm (Santosh's generation). It is during this period that literacy ratio and enrolment in schools grew with reduction in quality of learning; children went to school but did not even acquire basic skills.

It is in this background that the RTE 09 Act has come about. It retains the odd features of the system so far which are a strange mix of positive and negative, beneficial and harmful to the society. Usually a legal instrument, an Act makes things seem impersonal, and without having connection to our daily lives or circumstances. But in perspective of Bhima and her family's story we may make an effort to personalize the RTE Act.

## Home Activity

**Worksheet**

Distribute copies of worksheet 3. Ask the participants to complete the worksheet at home and bring in the filled sheets during the next session.

**Source**

*संसद में शिक्षा का अधिकार छिननेवाला बिल.* लेखक : अनिल सद्गोपाल. प्रकाशक : किशोर भारती, २००९.

*Political Economy of Education in the Age of Globalisation – de-mystifying the knowledge agenda* by Anil Sadgopal. Bharat Gyan Vigyan Sansthan, 2003.

'Inadequate funding for elementary education' by JBG Tilak. Combat Law, Volume 8, Issue 3 and 4, May-August 2009.

'A still-born Legislation!" by Niranjan Aradhyaya VP, Combat Law, Volume 8, Issue 3 and 4, May-August 2009.

©Avehi-Abacus Project